**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – अंकुश राम जयशेट्टे,

वय – ५४ वर्षे, व्यवसाय–शेती,

राहणार – रा.बडूर, ता.निलंगा, जि. लातूर .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर पाटील. यांचे मार्फत सुरुः–**

१. दिनांक ०६.११.२०१६ रोजी मी घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बडुर ते उस्तुरी जाणाऱ्या रोडवर, संतोष स्वामी यांचे ढाब्याच्या पुर्वेस रोडवर पंचनामा करण्यासाठी गेलो नव्हतो. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला नव्हता. (आता मला प्रस्तुत कामातील दि. ०६.११.२०१६ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) त्या घटनास्थळ पंचनाम्यावरील सही माझी आहे. त्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नाही. त्यामधील मजकुर आता मला वाचून दाखवण्यात आला. त्या निशाणी ७५ देण्यात आली. त्याप्रमाणे माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा झालेला नाही. बाबुराव गणपतराव बिराजदार हे माझ्या गावातील असुन ते कॅन्सरने आजारी आहेत. त्यांचे दोन्ही पाय काढलेले आहेत. ते सद्या पुणे येथे हॉस्पीटलमध्ये आहेत.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.११.२०१६ रोजी पोलिसांनी मला बडुर

ते उस्तुरी जाणाऱ्या रोडवर, संतोष स्वामी यांचे ढाब्याच्या पुर्वेस रोडवर घटनास्थळ पंचनामा करण्याकरिता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटना ठिकाण बडुर ते उस्तुरी जाणाऱ्या रोडवर, संतोष स्वामी यांचे ढाब्याच्या पुर्वेस रोडवर होते. हे म्हणणे खरे नाही की, बाबुराव गणपतराव बिराजदार हे पंचनामा करण्यासाठी माझ्यासोबत हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, मला वाचून दाखवला आणि त्यानंतर त्याच्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्याकरिता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. पी.सी.भोसले यांनी नाकारला–**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.03.10 17:40:43 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–१०/०३/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,
निलंगा